
# गोड गोड गोष्टी



गोविंद गोडबोले

# गो ऽ गो ऽ गोष्टी

गोविंद गोडबोले

प्रकाशन विभाग
माहिती आणि प्रसारण मंत्रालय
भारत सरकार

March 1992 Phalgun 1913

© **प्रकाशन विभाग**

**मूल्य : रु. १८.००**

प्रकाशक, प्रकाशन विभाग, माहिती आणि नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार,
पटियाला हाऊस, नवी दिल्ली-१
मुखपृष्ठ - रेखाटने - हर्षा शाह, स्वाती जोशी.

प्रकाशन विभाग ● विक्री केन्द्र

- सुपर बझार, कॅनॉट सर्कस, नवी दिल्ली-११० ००१.
- कॉमर्स हाऊस, करीमभॉय रोड, बेलार्ड पिअर, मुंबई-४०० ०३८.
- ८, एस्प्लनेड ईस्ट, कलकत्ता-७०० ००१.
- एल. एल. ए. ऑडिटोरियम, ७३६, अण्णामलाई, मद्रास-६०० ००२.
- बिहार स्टेट को ऑपरेटिव्ह बँक बिल्डिंग, अलोक राजपथ, पटणा-८०० ००४.
- प्रेस रोड, त्रिवेंद्रम-६९५ ००१.
- १०-बी, स्टेशन रोड, लखनौ-२२६ ००४.
- स्टेट अर्चालॉजिकल म्युझिअम बिल्डिंग, पब्लिक गार्डन, हैदराबाद-५०० ००४.

मुद्रक : मॉडर्न आर्टस अँड इंडस्ट्रिज, १५१ ए टू झेड इंडस्ट्रियल इस्टेट, मुंबई-४०० ०१३.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| 'मांत्रिक पळाला' | १ |
| 'छोटा संशोधक' | ७ |
| 'भोलूचं प्रौढशिक्षण' | ११ |
| 'संकट टळले' | १३ |
| 'बिरूची गोष्ट' | १७ |
| 'आळशी भोलू' | २२ |

# प्रकाशकीय

बालकुमारांच्या हाती ख्यातनाम लेखक श्री गोविंद गोडबोले यांच्या कथांचा खजिना देताना आम्हाला आनंद होत आहे. श्री गोडबोले यांची तुमच्याशी मासिकांतून केव्हाच गट्टी जमली आहे. त्यांचा मी अधिक परिचय तो काय देणार.

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण खात्याच्या प्रकाशन विभागातर्फे मुलांसाठी विविध भाषांमधे काही पुस्तकं प्रसिद्ध करण्याचं ठरविण्यात आलं. फारच कमी दिवसांत हे काम पूर्ण करायचं होतं. मराठी पुस्तकांच्या संपादनाची जबाबदारी आमच्या योजनेचे संपादक श्री नीतीन केळकर यांच्यावर सोपवली होती. त्यांच्या प्रयत्नांमुळेच हे पुस्तक आपल्यापर्यंत पोहोचवणं शक्य झालं. त्यांचेही आभार.

*डॉ. श्यामसिंह शशि*
संचालक

# ‘मांत्रिक पळाला’

जंगलात सध्या एकच विषय ज्याच्या त्याच्या तोंडी होता आणि तो म्हणचे कालू मांत्रिकाचा. गुरगुर जंगलात तो नव्यानच आला होता. उंचापुरा देह आणि मजबूत बांधा असलेल्या कालूनं आपल्या मंत्र सामर्थ्यानं सर्वांना चकित करून सोडलं होतं. हातात कुठलातरी पाला घेऊन सतत काहीतरी मंत्र पुटपुटणारा कालू दिवसा त्याच्या गुहेशेजारी त्यानंच केलेल्या धुनीसमोर बसून राही. समोरच्या कुंडातून कधी ज्वाला तर कधी धूर निघे. दिवसा . . . सहसा तो कधी प्राण्यांशी बोलत नसे. रात्री मात्र त्याचा मुक्त संचार चाले. गुरगुर जंगलाला मोठा समुद्र किनारा लाभला होता. त्या समुद्र किनारी हा फिरे. समुद्र आणि चंद्र त्याच्या हातात होते म्हणे. ते दोघेही कालू सांगेल त्याप्रमाणं वागत. कालू समुद्राला उधाण आणी, तर थोड्या कालावधीनं समुद्राला खूप मागे हटवी. चंद्राला तो शिक्षा करी. चंद्र हळूहळू छोटा छोटा होत जाई आणि एकदिवस तो त्याला अदृश्य करी . . . . सारे प्राणी कालूकडे धावत जात. आमचा प्रकाश आम्हाला परत द्या असं विनवीत. कालू त्यांना अभय देई . . . पुन्हा दुसऱ्या दिवसापासून चंद्र प्रकाशू लागे. कालूचं म्हणणं असं होतं की मी माझ्या मंत्र सामर्थ्यानं चंद्राला मुक्त करतो . . . . तो पंधरा दिवसांनी पूर्ण आकार घेऊन आकाशात प्रकाशू लागतो. पण या तुमच्या जंगलात काहीतरी पाप घडतं . . . कुणी तरी पाप करतं आणि पुन्हा त्याची शिक्षा मला चंद्राला करावी लागते. अशी शिक्षा मी केली नाही तर जंगलावर त्याचा विपरीत परिणाम होईल. तुमचं हे जंगलच हळूहळू नाहीसं होऊन जाईल . . . कालूनं असं सांगताच सगळे घाबरत . . . त्याला विनवत . . . मग कालू खुश होऊन त्यांना अभय देई.

गुरगुर जंगलातले असंख्य प्राणी मंत्र-तंत्रावर विश्वास ठेवणारे होते. सहाजिकच अल्पावधीतच कालूचं मोठा मांत्रिक म्हणून जंगलात नाव तर झालंच शिवाय चांगला जम बसला. मोठं नाव मिळाल्यामुळे मंत्र-तंत्र-सिद्धीसाठी त्याची फी देखील मोठी झाली . . . शिष्य गण वाढले . . . पिंपळाच्या मुंजाची बाधा . . . चिंचेवरच्या भूताची बाधा . . . नदीकिनारच्या संमंधाचा बंदोबस्त . . . . करणी . . . जादूटोणा . . . सर्वांवर त्याच्याकडे इलाज असे. सहाजिकच कमकुवत मनाचे पशुपक्षी त्याच्याकडे जात आणि तो त्यांना लुबाडे.

पण त्याच जंगलात असेही काही प्राणी होते की त्यांचा या मंत्र-तंत्रावर विश्वास नव्हता. कालूचा



भोंदूपणा त्यांना उघडकीस आणायचा होता. पण मार्ग सापडत नव्हता. समुद्र आणि चंद्राचं कोडं काही केल्या त्यांना उलगडत नव्हतं. चंद्र कसा बरं कमी कमी होतो? . . . कधी कधी जास्त पण होतो . . . समुद्राला उधाण येणं . . . समुद्र मागे हटतो . . . हे सारं तर डोळ्यासमोर घडतं . . . याला खरंच कालूच जबाबदार असेल का? पोपट, घार, गिधाड, खार आणि हत्तीदादानी खूप विचार केला पण काही उपयोग झाला नाही. त्यांची बुध्दी कमी कमी पडत होती. शेवटी सळसळ जंगलात राहाणाऱ्या आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचं काम करणाऱ्या एकशिंग्या गेंड्याला बोलवायचं त्यांनी ठरवलं.

पत्र मिळताच एकशिंग्या धावत आला. त्यानं पहिल्यांदा कालूला समजावण्याचा प्रयत्न केला. पण कालू त्याचं ऐकायला तयार नाही. मला खरीच मंत्र विद्या अवगत झाली आहे आणि त्याचा उपयोग मी करणारच . . . मी या विद्येचा उपयोग प्राण्यांच्या कल्याणासाठी करतोय असं तो ठामपणे सांगे. शेवटी एकशिंग्यानं जशास तसे वागायचं ठरवलं. जंगलाच्या दुसऱ्या बाजूला समुद्र किनारी तोही धुनी पेटवून बसला. त्यानंही मंत्र म्हणायला सुरुवात केली. काही अंधश्रद्धाळू पशु-पक्षी त्याच्याकडंही जायला लागले. त्याची फी पण कालूपेक्षा कमी होती.

आता दोघंही एकमेकांना आव्हान देऊ लागले. एकशिंग्या तर समुद्राला उधाण केव्हा येणार, किती काळ टिकणार, परत किती वाजता तो त्याला मागवणार, हे अचूक सांगू लागला. कालू म्हणे मला हे सांगायची माझ्या गुरूची आज्ञा नाही. चंद्राच्या बाबतीतही एकशिंग्यानं उलटा पवित्रा घेतला. तो म्हणे तुमचं पाप नाही. कालूनं एका राक्षसाला गुरू केलाय. तो राक्षस या चंद्राला खातो. मी मंत्र सामर्थ्यानं त्याला पुन्हा बाहेर काढतो. चंद्राची ताकद वाढवायची असेल तर एक काम करा. सर्वांनी भरपूर मेहनत करा. फळं . . . भाजी . . . धान्य पिकवा. मी ते सारं मंत्रसामर्थ्यानं चंद्राला देईन. खाऊन पिऊन तो चांगला धष्टपुष्ट होईल. त्याची ताकद एवढी वाढेल की तो एक दिवस सूर्याला पण खाऊन टाकेल . . . प्राण्यांना ते खरं वाटलं . . . कालूनं ते खारं खोटं आहे असं सांगितलं.

आणि एक दिवस एकशिंग्यानं जाहीर केलं. चंद्र बलवान झाला. आज सकाळी ठीक दहा वाजता तो सूर्याला गिळायला सुरुवात करेल. आणि कालूच्या पापाचा घडा जसजसा भरेल तसतसा तो त्या अधिकाधिक गिळेल. आणि कालूचं मंत्र सामर्थ्य पूर्ण नष्ट झालं आणि त्याचं पाप शिगेला पोहोचलं की तो संपूर्ण सूर्याला गिळून टाकेल. कालूनं हे ऐकलं आणि तो हादरला. चंद्र काही सूर्याला गिळणं शक्य नाही असं त्याला वाटत होतं पण एकशिंग्याचा हा नवीन कुठला डाव? त्यामुळं तो बेचैन झाला. त्याच्या बाजूचे पशु-पक्षी त्याला यासंबंधी विचारत होते ते वेगळंच.

दहा वाजले मात्र . . . सगळ्यांनी आकाशात पाहिलं तिथं तर खरोखरच चंद्रानं सूर्याला गिळायला सुरुवात केली होती. तो हळूहळू गिळत होता. थोड्यात वेळात त्यानं सूर्याला पूर्ण गिळलं . . . कुणी तरी म्हणालं . . . कालू पापी आहे . . . त्याला या जंगलातून हाकलून द्या . . . पशु-पक्षी कालूकडे धावले . . . .जीव घेऊन तो पळाला . . . पुन्हा या जंगलात यायचं नाही असा निश्चय करत तो पळत

होता. सगळे प्राणी एकशिंग्याकडं आले. सूर्याला सोडवण्याची त्यांनी विनंती केली. कारण पृथ्वीवर अंधारून आलं होतं. एकशिंग्यानं मग मंत्र पुटपुटून सूर्याची सुटका केली. सगळ्यांनी एकशिंग्याचा जयजयकार केला. . . . त्याचा सत्कार केला. तेव्हा मग एकशिंग्या बोलायला उभा राहिला.

'मित्र हो! या जंगलातलं माझं काम संपलं आहे. शेजारच्या जंगलातून हद्दपार केलेला कालू कुत्रा मांत्रिक असल्याचं भासवून तुम्हाला फसवत होता. पोपट, घार, घुबड, खार साऱ्यांचंच आयुष्य धोक्यात आलं असतं. उदाहरण घ्यायचं झालं तर मी का दिवसाच इथं आलो तर सत्त्याहत्तर पोती धान्य साठलय. पैसे म्हणाल एक लाख सात हजार तीनशे ऐंशी रुपये. ते सगळे पैसे मी गुरगुर जंगल विकासाला देत आहे. या पैशातून प्राण्यांमधील अंधश्रद्धेचं निर्मूलन व्हावं. धान्य गोरगरिबांना वाटावं . . . मित्रहो . . . मंत्र . . . तंत्र . . . भूतबाधा सगळं खोटं आहे. आपल्या मनात भितीचंच मांत्रिक भूत करतो आणि मग ते बसतं आपल्या मानगुटीवर. तुम्ही सगळे अडाणी. त्याचा फायदा कालूनं घेतला. विज्ञानातला साधा भाग तुम्हाला माहीत नाही? मित्रानो, चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह आहे. तो पृथ्वीभोवती फिरतो. पृथ्वी ही स्वत:भोवती फिरते आणि स्वत:भोवती फिरत फिरत चंद्राभोवती फिरते. आपल्या पृथ्वीला सूर्यामुळं प्रकाश मिळतो. चंद्राला सूर्यापासून प्रकाश मिळतो. सूर्य त्यामानानं स्थिर आहे. पृथ्वी फिरते आहे. त्यामुळं आपल्याला वाटतं की सूर्य पूर्वेला उगवतो. पश्चिमेला मावळतो. पण तसं नसतं. पृथ्वीचाच एकेक भाग सूर्यासमोरून सरकत असतो. आगगाडीतून जाताना किंवा एस्. टी. मधून जाताना झाडं पळाल्यासारखी वाटतात ना? खरं कोण पळत असतं? आपण . . . तसंच हे . . . तशीच दुसरी गोष्ट. सूर्याचा प्रकाश चंद्राला मिळतो. तो जसजसा वाढेल तसतसा आपल्याला चंद्र मोठा मोठा दिसतो. चंद्र व पृथ्वी यांच्या फिरण्यामुळे कधी कधी सूर्य व पृथ्वी यांच्यामध्ये चंद्र येतो म्हणजे चंद्राचा अप्रकाशित भाग पृथ्वीच्या बाजूला असतो सहाजिकच त्यादिवशी आपल्याला चंद्र दिसत नाही. त्याला आपण अमावास्या असं म्हणायचं. पुढे दररोज सुमारे बावन्न मिनिटांनी चंद्राचा भाग अधिकाधिक दिसायला लागतो. चंद्राच्या या कमी-जास्त होण्याच्या क्रियेला विज्ञानात 'चंद्रकला' असं म्हणतात. समुद्राची भरती-ओहोटी ही देखील यावर अवलंबून असते. दररोज साधारण सहातास भरती व त्यानंतर सहातास ओहोटी असते. पौर्णिमा किंवा अमावास्येला ही भरती खूप मोठी असते. कालूनं विज्ञानाचा अभ्यास केला पण तो अर्धवट आणि त्याचा सदुपयोग करण्याऐवजी त्यानं दुरुपयोग केला. म्हणून त्याला शिक्षा करायचं मी ठरवलं. तुम्हीही अंधश्रद्धाळू. तुम्हालाही त्याच मार्गानं पटवावं म्हणून आजचा दिवस निवडला. आज सूर्यग्रहण. विज्ञानातला चमत्कार म्हणा हवा तर. चंद्र ग्रहण आणि सूर्य ग्रहण हे ग्रहणाचे दोन प्रकार. जो ग्रह दिसत नाही त्याला ग्रहण म्हणायचं. सूर्य दिसत नाही सूर्य ग्रहण. ही तुमच्यासाठी साधी व्याख्या हं. हे बघा. वडाच्या झाडामागं लांब अंतरावर कुणी प्राणी उभा राहिला तर तो दिसेल का? . . . बरोब्बर . . . नाही. कारण त्या प्राण्यात आणि आपल्यात झाडाचा बुंधा आडवा येतो. इथंही तसचं . . . चंद्र फिरता फिरता पृथ्वी व सूर्याच्या मधे आला त्यामुळं आपल्याला सूर्य दिसेना . . . ही वैज्ञानिक गोष्ट आज घडणार मला माहीत होतं.

त्याचा फायदा मी असा उठवला. कालूचा विज्ञानाचा अभ्यास कच्चा . . . त्यामुळं हे त्याला काही कळलं नाही. तर मित्रहो आता कुणी अडाणी राहू नका. गुरगुर जंगलात भोलू कोल्हयानं प्रौढ शिक्षणाचं केंद्रही काढलंय त्यात शिकायला जा . . . कालूचे पैसे धान्य . . . मदतीसाठी घ्या . . . सर्व प्राण्यांना एकाशिंग्याचा अभिमान वाटला. दुःखी मनानं त्याला त्यांनी निरोप दिला . . . पण आता विज्ञानाचा अभ्यास करायचा असा निश्चय करूनच.

● ● ●



# 'छोटा संशोधक'

पोपटाला सुंदरवनातील सिंह महाराजांनी जंगल विज्ञान शिष्यवृत्ती दिल्यापासून संपूर्ण सुंदरवनात एक विज्ञान लाट आली होती. जो तो प्राणी काही शोध लावता येतो का हेच पहात असे. सुंदरवनातून प्रसिद्ध होणारा 'जंगल टाइम्स'चा अंक पाहिला की याची कल्पना यायची. दररोजच्या अंकात याविशयीच्याच बातम्या असायच्या. कुणी कुणी या दृष्टीनं प्रगती केली त्यांची नावे फोटोसह असायची. पप्पू हत्ती, बबलू अस्वल यांच्या खाजगी प्रयोगशाळेत तर दिवस रात्र संशोधन चालायचं. प्रत्येकाची संशोधनाची पद्धतही वेगळी.

त्याच जंगलात एक उंदीर राहात होता. छोटू त्याचं नाव. आपणही काही तरी शोध लावावा असं त्याला नेहमी वाटे. तसा तो लहानपणापासून शोधक वृत्तीचा. खाण्याच्या पदार्थाचा त्याच्या तीक्ष्ण नाकाला चटकन् वास येई. लगेच आमचा हा संशोधक तो पदार्थ हुडकून काढून गट्टम करी. पण अशा संशोधनाचा फायदा काय? फार तर पोट भरे. पण जंगलात नाव कमवायचं असेल तर असं संशोधन कामाचं नव्हतं. काय बरं करावं? विचार करून करून छोटूचं डोकं गरगरायला लागलं. तेव्हा संशोधनाचा विचार सोडून छोटू बाहेर खेळायला गेला.

प्राण्यांची ही संशोधनाची आवड लक्षात घेऊन जंगल टाइम्सच्या चाणाक्ष संपादकानी एक वेगळाच उपक्रम हाती घेतला. आता दररोजच्या अंकात एका शास्त्रज्ञाचा परिचय छापून येऊ लागला. त्या शास्त्रज्ञानं संशोधनासाठी किती कष्ट घेतले? . . . संशोधन कसं केलं? याचं सविस्तर वर्णन त्यात असे. आधीच संशोधन वृत्तीनं झपाटलेलं हे जंगलवासी त्यात अशा रोजच्या अंकात छापून येणारा शास्त्रज्ञाचा परिचय . . . मग काय? . . . जंगल टाइम्स वर सगळ्या प्राण्यांच्या अगदी उड्या पडायच्या. एकही अंक शिल्लक राहीनासा झाला. संपादकानं अंकाची आवृत्ती वाढवली. खपही तसाच वाढत राहिला. प्राण्याच्या बिळापर्यंत पक्षांच्या घरट्यापर्यंत अंक जाऊ लागला. खप वाढल्यानं जाहिराती वाढल्या . . . वितरण व्यवस्था अधिक मोठी झाली . . . एजंट वाढले . . . वार्ताहर वाढले . . . जंगल टाइम्सचा संपादक, मालक गब्बर झाला. काहींनी फिरती वाचनालयं काढली. गरीब प्राण्यांना त्याचा पायदा होई. झाडाच्या बुंध्यावर ठिकठिकाणी असे अंक असत. सुतार आणि सुगर पक्षानं यासाठी मेहनत घेतली. गरीब प्राण्यांनी त्याना दुवा दिला. साहजिकच सकाळ झाली की घरात आणि बाहेर सगळीकडे एकच दृश्य . . . प्राणी . . . पक्षी . . . जंगल

टाइम्सचं वाचन करताहेत.

असाच एक दिवस आपला छोटू उंदीर पेपर वाचत होता. त्या दिवशीच्या अंकात 'न्यूटन' या शास्त्रज्ञाचा परिचय आणि त्यांनी लावलेल्या गुरुत्वाकर्षणाच्या शोधासंबंधी माहिती होती. झाडावरून पडणाऱ्या फळाचं निरीक्षण त्यानं कसं केलं... हा मुद्दा घेऊन संशोधनात निरीक्षणाचं महत्त्व किती मोठ्ठं आहे त्याचं सविस्तर विवेचन पुढं दिलं होतं... हाच मुद्दा छोटूनं उचलला आणि ठरवलं की आपणही निरीक्षण करायचं.

दुसऱ्या दिवसापासून छोटूने निरीक्षणाला सुरुवात केली. खिशात एक छोटी वही, एक पेन्सिल घेऊन तो हिंडू लागला. काही वेगळं दिसलं की तो लिहून घेऊ लागला. निरीक्षणासाठी आपले छोटे डोळे त्याला अपुरे वाटू लागले. जंगल टाइम्स मधे एक दिवस त्यानं एक वाक्य वाचलं... 'वैज्ञानिक निरीक्षणासाठी हवा शक्तिशाली डोळा...' तो विचार करू लागला. असा डोळा मिळवायचा कुठून ?... विचार करता करता... आणि निरीक्षण करता करता त्याला याचं उत्तर सापडलं. छोटूचे आजोबा चष्मा लावत... हा डोळा नक्कीच मोठा आहे... त्यानं आजोबांची चाळशी पळवली. डोळ्याला लावून हिंडू लागला. निरीक्षण करू लागला. पण आजोबांच्या या चष्म्याचा नंबर मोठा होता. थोडयाच वेळात निरीक्षण करता करता आमचा छोटा संशोधक चक्कर येऊन एका झाडाखाली कोसळला. बरं तर बरं. त्याचे मित्र आसपास होते. त्यांनी घरी पोहचवलं. नाहीतर मनीमाऊनं केलं असत गट्टं त्याला.

आजोबांची बोलणी खाल्ली तरी छोटूचं निरीक्षणाचं वेड काही कमी झालं नाही. त्याच्या डोक्यात एकच विचार... निरीक्षणासाठी शक्तिशाली... मोठा बलवान डोळा... कुठून आणायचा?... आणि एक दिवस त्याला याचं उत्तर सापडलं... एक मोठ्ठं बहिर्गोल भिंग त्याला मिळालं. त्यातून छोटी वस्तू खूपच मोठी दिसत होती. आपण चक्कर येऊन बेशुद्ध पडणार नाही याची खात्री पटल्यावर त्यानं त्या भिंगाच्या मदतीनं आपलं निरीक्षण पुढे सुरू केलं.

रात्रंदिवस संशोधन करून छोटूनं आपण केलेलं निरीक्षण वहीत नोंदवून ठेवलं. ती छोटी वही त्यानं लिहिलेल्या निरीक्षणानं संपून गेली. आपण केलेल्या नोंदी पाहून आणि वाचून छोटू स्वत:वरच खूश झाला. या संशोधनांवर सुंदरवनामधे एक संशोधक म्हणून आपल्याला नक्कीच नाव मिळेल असं त्याला वाटलं. ती टिपणं घेऊन जंगल टाइम्सच्या संपादक गप्पू हत्तीकडं छोटू गेला. गप्पूला त्यानं वही दाखवली... गप्पू वहीतल्या नोंदी वाचू लागला व हसू लागला... छोटूला काही कळेना. काही नोंदी अशा होत्या.

चष्म्याने निरीक्षण करू नये.

संशोधकाचा डोळा... भिंगऽऽ!...

फुलाचे फळ बनते.

पावसाळ्यात पाऊस पडतो.

निशिगंधाच्या फुलाला वास असतो.


भज्याचा वास मला खूप दुरून येतो.

गप्पू आणखी हसू लागला तसा छोटू रागावला. म्हणाला जंगल टाइम्स मधे माझा गौरव तुम्हाला छापायचा नसेल तर नका छापू पण हसताय कशाला? माझी वही मला परत द्या. छोटू रागावला तसा गप्पू गप्प झाला. तो छोटूला म्हणाला, 'मित्रा रागावू नकोस.' छोटूला बरं वाटलं, गप्पू पुढं बोलू लागला. या संशोधनासाठी कुणाची मदत तू घेतली होतीस? कुणाचं मार्गदर्शन घेतलं होतंस? तसा छोटू गप्प बसला. तो काय बोलणार? गप्पूनं त्याला बोलतं केलं तसा तो म्हणाला, 'संशोधन गुपचूप करायचं असतं ना? त्याला कशाला हवं मार्गदर्शन?' मग मात्र गप्पूला रहावलं नाही. तो म्हणाला की हे बघ छोटू, अरे संशोधन करायचं म्हणजे संशोधकाला आधी कशावर संशोधन करायचं ते ठरवायला लागतं. मग, म्हणजे विषय ठरल्यावर यापूर्वी या विषयावर काही संशोधन झालय का? त्याचा तपास करावा लागतो. झालं असेल तर त्याचे निष्कर्ष काय आहेत? आपल्याला त्यात काय भर टाकता येईल ते पहावं लागतं. पावसाळ्यात पाऊस पडतो, किंवा फुलाचे फळ बनते... या तुझ्या संशोधनात कायरे नवीन आहे. पक्षांच्या छोटचा पिल्लाला पण हे ठाऊक आहे. गप्पूचं हे भाषण ऐकताच छोटू हिरमुसला. पण गप्पूनं त्याला जवळ घेतलं. तो म्हणाला, 'छोटू तुझ्या मधे संशोधन करण्याची वृत्ती आहे ही गोष्ट चांगली आहे. पुढं तू निश्चित मोठा संशोधक होशील. पण त्यासाठी तुला हवं मार्गदर्शन. हे बघ, निशिगंधाच्या फुलाला वास असतो आणि आणखी एका फुलाला वास नसतो हे होईल तुझं निरीक्षण. पण वास नसणाऱ्या फुलाला निशिगंधासारखा वास येईल करा? हा होईल संशोधनाचा विषय. आणि तसा तो तू त्या फुलाला प्राप्त करून दिलास तर ते होईल तुझं संशोधन.

गप्पू हत्तीनं संशोधन करताना आधी काय करावं लागतं ते सांगितलं आणि निरीक्षण आणि संशोधन यातला फरक सांगितला तसा छोटू टुण्णकन् उडी मारून उठला आणि म्हणाला, 'गप्पू दादा लवकरच मी संशोधक म्हणून नाव मिळवीन. केलेल्या मार्गदर्शनाबद्दल धन्यवाद.'

छोटू गेला त्या वाटेकडे गप्पू किती तरी वेळ पहात होता. त्याच्या मनात विचार आला की, छोटू सारखे किती तरी प्राणी, पक्षी संशोधन करू इच्छित असतील पण त्यांना मार्ग माहीत नसेल. हुशार आणि मुरलेल्या गप्पूच्या मनात हा विचार आला मात्र, लगेच त्याच्या मनातला संपादक जागा झाला. त्यानं टेबलावरचे कोरे कागद आपल्यापुढं ओढले आणि दुसऱ्या दिवसासाठी याच विषयावर अग्रलेख लिहायला सुरुवात केली. अग्रलेखाचं शीर्षक होतं, 'छोटा संशोधक'.

● ● ●



# ‘भोलूचं प्रौढशिक्षण’

गुरगुर वनात सर्व प्राण्यांच्या तोंडी एकच विषय होता तो म्हणजे जंगलात निघालेली रात्रीची शाळा. रात्रीच्या या शाळेबद्दल सर्वांनाच कौतूक वाटत होतं. तिथं कोण शिकवणार? काय शिकवणार? कसं शिकवणार... सारेच प्रश्न.. हे प्रश्न कमी पडले म्हणून की काय आणखी काही प्राण्यांनी आणखी काही प्रश्न निर्माण केले... सगळ्या पशुपक्षांच्या मुलांसाठी सकाळी आणि दुपारी शाळा असताना ही रात्रीची शाळा कशासाठी?... ह्या शाळेत विद्यार्थी कोण? ... प्रश्न इतके झाले की, बबलू अस्वल, किटू लांडगा आणि छोटू ससा धीटपणानं शेवटी शाळा काढणाऱ्या भोलू कोल्होबाकडं गेलेच. भोलूनं त्याचं स्वगत केलं. ‘या... या... आज गरीबाच्या गुहेकडे कसे काय पाय वळले आपले?’

‘तुझ्या रात्रीच्या शाळेमुळे’ छोटू म्हणाला.

‘हं... हं... त्याला रात्रीची शाळा नाही म्हणायचं’

‘मग?’

‘हे आहे प्रौढ शिक्षण केंद्र’

‘पण हे कशासाठी?’

‘चांगला प्रश्न विचारलात... बसा सांगतो... आपल्या या जंगलांत प्राणी किती आहेत?...

‘किती तरी!’

‘पक्षी किती आहेत?’

‘खूप आहेत’

‘शिकलेले किती आहेत?’

‘फार थोडे!’

‘मग त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी हे प्रौढ शिक्षण केंद्र काढलंय, न शिकलेल्यांसाठी...’

‘पण त्यांना शिकवणारा मास्तर कोण?’

‘मास्तर नाही म्हणायचं’

‘मास्तर नाही म्हणायचं? मग?’

'अरे ही शाळा नाही . . . मास्तर किंवा गुरुजी शाळेत असतात.'

'हो . . . पण हे केंद्र चालवणार कोण ?'

'मीच ! . . . पण असं केंद्र चालवणाऱ्याला संघटक म्हणायचं.'

'संघटक ?'

'हं . . . . केंद्रात येणाऱ्या प्राण्यांचं तो संघटन करतो ना . . . त्यांना एकत्र आणतो . . .'

'काहीतरीच बुवा तुझं' . . . असं म्हणून प्राणी भोलूच्या गुहेतून बाहेर पडले.

भोलूनं प्रौढ शिक्षणाचं केंद्र काढण्यासाठी खूप मेहनत घेतली होती. सुरुवातीला त्यानं आपल्या गुहेच्या आसपासच्या पशुपक्षांना भेटी दिल्या. त्यापैकी निरक्षर किती आहेत ? . . . साक्षर किती आहेत याची यादी तयार केली आणि जे निरक्षर आहेत त्यांना केंद्रात यायला सांगितलं . . . पण प्राणी . . . पक्षी . . . काही तिथं यायला तयार होईनात. सगळे हेच म्हणायचे आम्हाला आता या वयात शिकून काय मिळणार आहे ?

भोलूनं आपल्या भागात रहाणाऱ्या सर्व पक्षु-पक्षांची एक सभा बोलाविली. आणि त्या सभेत शिक्षणाचं महत्त्व सांगितलं. बाबानो ! तुम्ही शिकलेले नाहीत म्हणून तुम्हांला कुणीही लुबाडतं. आपल्या जंगलात काम घेणारा ठेकेदार तरस . . . तुम्हा सर्वांना माहीत आहे. पण तो मजुरी देताना किती लुबाडतो तुम्हाला आहे ठाऊक ? . . . तुम्हाला साधे साधे हिशोब पण येत नाहीत . . . त्याचा फायदा तो घेतो, तेवढी रक्कम तुम्हाला तो देतच नाही. तुम्ही काय त्याच्या रजिस्टर मधल्या कागदावर अंगठा उठवता आणि मिळालेली रक्कम घेऊन निघून जाता. रक्कम काही तुम्हाला मोजता येत नाही. . . सगळ्यांचे असे पैसे खाऊन तो चांगला गब्बर झालाय . . . तुम्हाला तो असं फसवतोय याचं तुम्हाला काहीच वाटत नाही का ? . . . जर त्याच्याकडून तुम्ही इतके फसवले जाऊ नये असं तुम्हाला वाटत असेल तर तुम्हाला साधे साधे हिशोब यायला हवेत. म्हणजे तुम्ही शिकायला हवे. सगळ्यांनी माना डोलावल्या. भोलूचं म्हणणं त्याना पटू लागलं होतं.

आणखी एक गोष्ट . . . असं म्हणून भोलू पुढे सांगू लागला. तुम्ही जंगलात आपल्या नातेवाइकाकडं जाता. तुम्ही प्रत्येकजण काही श्रीमंत नाही, त्यामुळे स्वत:च्या मोटारीतून जाऊ शकत नाही. सहाजिकच जंगलातल्या मोटार स्टँडवर तुम्हाला जावं लागतं. तिथं मोटारीवर जी पाटी लिहीलेली असते ती काही तुम्हाला वाचता येत नाही. दहा जणांना मग विचारावं लागतं. कधी कधी कुणी तुमची गमंत करतात. दुसऱ्याच कुठल्यातरी मोटारीत तुम्हाला बसवतात. . . तुमचा अपमान होतो. . . यापेक्षा तुम्हाला वाचता आलं तर असा अपमान सहन करावा लागणार नाही. . . भोलूचं म्हणणं सर्वांनाच पटलं.

आणि एक दिवस भोलूच्या प्रौढ शिक्षण केंद्राचं मोठ्या थाटामाटात उद्घाटन झालं. प्रत्यक्ष सिंह महाराजांनीच या केंद्राचं उद्घाटन केलं . . . भोलू तन्मयतेनं सर्वांना मार्गदर्शन करू लागला. शिकवू लागला . . .

● ● ●


# 'संकट टळले'

आनंद वनात एका पाठोपाठ एक नवनवीन गोष्टी येऊ लागल्या. टी. व्ही. आला, फोन आले... आणि आता दोन चाकी... आणि चार चाकी स्वयंचलित वाहनं आली. पेट्रोल, डिझेल वर चालणारी वाहनं आली तसे पेट्रोल पंप आले. जंगलात सुधारणा झाली... प्राण्यांनी, पक्षांनी सिंह महाराजांना दुवा दिला... सारं जंगल आनंदानं नाचू लागलं.

जंगलात दोन पेट्रोल पंपही निघाले. एकाचा मालक होता ढाण्या वाघ तर दुसरा पंप सुरू केला कोल्होबांनी. वाघोबांच्या पेट्रोल पंपावर चिक्कार गर्दी असायची. कारण तो सचोटीनं धंदा करीत असे. पेट्रोलमधे भेसळ नसायची. पण कोल्होबाचं तंत्रच न्यारं. तिथे दोन पैशानं स्वस्त पेट्रोल मिळायचं पण त्यात भेसळ असायची: त्यामुळे वाहनं खराब व्हायची. अनेक प्राण्यांची वाहनं, तिथं पेट्रोल भरल्यामुळं खराब झाली. सहाजिकच प्राणी तिकडे जाईनासे झाले. अगदी अडलाच तरच जायचे. शिवाय वाघोबाच्या पेट्रोल पंपावर पेट्रोल द्यायला पिटकू उंदराची नेमणूक केली होती. पिटकू व्यवस्थित माप देत असे. एक थेंब जास्त नाही की एक थेंब कमी नाही. वाघोबा कधीही प्राण्यांची नाडवणूक करीत नव्हते. पेट्रोल असलं की देऊन टाकत. उलट कोल्होबा पेट्रोलचा काळाबाजार करी. पेट्रोलची कृत्रिम टंचाई निर्माण करी. आणि वाघोबाच्या पंपावरचं पेट्रोल संपलं की जास्त भावानं आपल्या पंपावरचं पेट्रोल विकत असे. प्राणी-पक्षी नाईलाजानं घेत कारण वाहनांची त्यांना सवय झाली होती. पायी चालणं त्यांच्या जिवावर आलं होतं... नव्हे ते आता पायी चालूच शकत नव्हते.

आनंद वनात सुधारणा आल्या आणि काही दिवसांतच सिंह महाराज त्रस्त झाले. जंगलाची प्रगती होत होती. पण जंगलावर काहीतरी अरिष्ट आलं होतं. पक्षांकडून आणि प्राण्यांकडून अनेक प्रकारची गाऱ्हाणी येऊ लागली. अंधश्रद्धाळू पक्षी-प्राणी महाराजांना दोष देऊ लागले. यापूर्वी असं कधीही झालं नव्हतं. मग हे आत्ताच कसं झालं? सिंह महाराजांनी जंगलात सुधारणा आणली अन् नक्कीच वनदेवता कोपली. अनेक जण असं म्हणून लागले.

असं झालं तरी काय होतं? कसल्या होत्या तक्रारी? अनेक पक्षांनी अनेक तक्रारी केल्या होत्या त्यात प्रमुख तक्रार होती ती ही की अनेक पक्षांची अंडी उबवलीच जात नाहीत. त्यातून पिल्लू बाहेर येत नाही. यापूर्वी असं कधीच झालं नव्हतं. प्राण्यांमध्ये प्रमुख तक्रार होती ती असंख्यांच्या तब्येती बिघडण्याची.


पेट्रोलची बचत करा.
पेट्रोल

साठ ते सत्तर टक्के प्राण्यांच्या तब्येती बिघडल्या होत्या.

हे सारं ऐकून सिंह महाराजही स्वत: जरा गोंधळात पडले. हे सारं आपल्यामुळं झालं? खरचं का वनदेवता रागावली... पण हे कसं शक्य आहे?... नाही... नाही... ही सारी अंधश्रद्धा आहे... पण यावर उपाय करायला हवा होता. सिंह महाराजांनी अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवणाऱ्या काही हुशार प्राण्यांची सभा बोलावली. जंगलात निर्माण झालेला हा प्रश्न त्यांच्या समोर मांडला. सगळ्यांनी यावर विचार करून, निरीक्षण करून उत्तर देण्याचं आश्वासन दिलं.

जंगलात आज एकच धांदल उडाली होती.सर्व पशु-पक्षांची आज सभा होती. स्वत: सिंह महाराज या सभेला मार्गदर्शन करणार होते. सगळे प्राणी जमले. सिंह महाराजही आले. एक मोठी गर्जना करून त्यांनी सर्वांना आधी गप्प केलं. आणि मग बोलायला सुरूवात केली.

'मित्र हो! या जंगलात मीं सुखसोयी, नवीन योजना आणल्या पण दु:खानं मला असं म्हणावसं वाटतं की त्याचा फायदा तुम्ही नीट करून घेतला नाही. उलट तुम्ही असा गैरसमज करून घेतला की मीच या तुमच्या दु:खाला जबाबदार आहे. म्हणे वनदेवता कोपली आहे. अरे वनदेवता कशाला कोपेल? देव का कधी कोपतो? चूक तुमची, स्वत:ची तुमच्या अडाणीपणाची. आता सारच सांगतो. ऐका. जंगलात या समस्या का निर्माण झाल्या आहेत याचा आढावा घेण्यासाठी मी काही हुशार प्राणी-पक्षी बोलवले. त्यांनी गेले काही दिवस मेहनत घेऊन संशोधन केलं. परिस्थितीची पाहणी केली. त्यांच्या लक्षात आलेल्या गोष्टी तुम्हाला सांगतो म्हणजे तुमची चूक तुमच्या लक्षात येईल. पहिली गोष्ट म्हणजे ज्या पक्षांनी आमच्या अंड्यातून पिलं बाहेर आली नाहीत अशी तक्रार केली आहे ते सर्व टेलिफोन धारक आहेत. केवळ ज्यांच्या घरी टेलिफोन आहे त्याच पक्षांच्या बाबतीत असं घडलं आहे. त्यांच्या घरी जाऊन बारकाईनं चौकशी केली असता असं लक्षात आलं की अंडी उबवणाऱ्या पक्षांनी आपलं काम बरोबर केलं नाही. दिवसातले कित्येक तास ते आपल्या मित्र मैत्रिणींबरोबर फोनवरून बोलत बसायचे. साहजिकच अंडी उबवण्यासाठी आवश्यक असणारी उष्णता अंड्याला मिळत नसे. ऊबदार झालेली अंडी उलट थंड होत. मग तुम्हीच सांगा त्यातून पिलू कसं बाहेर येईल?... हा काय देवतेचा कोप झाला? देवतेचा कोप झाला असता तर कोणत्याच पक्षाच्या अंड्यातून पिलं बाहेर आली नसती... पण तसं नाही... आणि त्याहीपेक्षा देव असा कोपत नसतो. आता दुसरी एक महत्त्वाची तक्रार म्हणजे अनेक प्राण्यांच्या प्रकृती बिघडल्या आहेत. मित्र हो! त्यालाही जबाबदार ते प्राणीच आहेत. ज्या प्राण्यांच्या तब्येती बिघडल्या त्या सर्वांची यादी केली असता असं लक्षात आलं की हे सर्व प्राणी वाहनांचा अवास्तव वापर करतात. वाहना शिवाय हे बाहेर जातच नाहीत. व्यवसायातही याचं काम एकाच ठिकाणी बसायचं आहे. मला सांगा अशा प्रकारे कुठलाही व्यायाम ते करणार नाहीत आणि नुसतं बसून खातील तर तब्येती बिघडणार नाहीत? जंगली प्राण्यानं उड्या मारल्या पाहिजेत, डरकाळ्या फोडल्या पाहिजेत आणि मुख्य म्हणजे वाहनांचा अवास्वव उपयोग थांबवला पाहिजे. या सर्वांचा अभाव झाल्याने या सुखसोयी प्राण्यांच्या दु:खाला

कारणीभूत झाल्या. मित्रानो ! मी पुन्हा एकदा कळकळीनं सांगतो की विज्ञानानं लाभलेल्या या सर्व सुखसोयींचा गरजेपुरता उपयोग करा. अतिरेक टाळा. ज्यांच्या जवळ स्वयंचलित वाहनं आहेत त्यांनी कामापुरतीच ती वापरावीत. उगाच ऐट दाखवण्यासाठी त्याचा वापर होऊ नये. आणखी एक धोका तुम्हाला सांगतो. पेट्रोल किंवा डिझेल आपल्या जंगलात मिळत नाही. ते आपल्याला दुसऱ्या जंगलातून आणावं लागते. साहजिकच आपल्या जंगलातला पैसा पेट्रोल खरेदीसाठी दुसऱ्या जंगलात जातो आहे. आणि या जंगलांनी पेट्रोल द्यायचं जर नाकारलं तर काय होईल तुमच्या वाहनांचं ? जागेवरच गंजून जातील ती वाहनं. अर्थात हा संभाव्य धोका लक्षात घेऊन आम्ही या जंगलातले पेट्रोलचे साठे शोधत आहोत. मला सांगायला आनंद वाटतो की असा एक साठा आपल्याकडे सापडला आहे. या तेल विहीरीतून लवकरच तेल उत्पादन सुरू होईल. प्राण्यांच्या टाळ्यांच्या गजरात महाराजांनी पुन्हा एकदा गरजेपुरतीच वाहनं, टेलिफोन वापरण्याचं आवाहन करून आपलं भाषण संपवलं.

महाराजांच्या भाषणाचा योग्य तोच परिणाम झाला. अंधश्रद्धा नष्ट होऊन प्राणी-पक्षी डोळस झाले. आणि दुसऱ्या दिवसापासून जंगलातलं चित्रच बदललं. प्राणी व्यायाम करू लागले . . . धावू लागले . . वाहनं, टेलिफोन कमी वापरू लागले . . . महाराजही आनंदी झाले . . . जंगलावरचे संकट टळले . . .

● ● ●

# 'बिरूची गोष्ट'

एक होतं घनदाट जंगल. जसं ते दाट होतं तसं ते खूप मोठ्ठं होतं. कुठल्याही दिशेनं तुम्ही चालत जा... संपायचं नावच नाही. जंगलाच्या मध्यभागातून तुम्ही निघालात तर वीस दिवस आणि वीस रात्री तुम्हाला सतत चालावं लागेल, तेव्हा कुठं ते जंगल संपेल असं म्हणत. पण तसा प्रयत्न कोणाही प्राण्यानं किंवा अगदी पक्षांनीही केला नाही. त्याला कारणही तसंच होतं. एक कारण असं की जगंल एवढं दाट होतं की त्यातून चालत जाणच मोठं मुश्किल होतं. सतत पाच मिनिटं काही चालत जाता येत नसे. वृक्ष, वेली अशा आडव्या-तिडव्या पसरल्या होत्या की पुढं पाऊल टाकणंच शक्य व्हायचं नाही. आणि दुसरं कारण असं की पशु-पक्षी असा विचार करायचे की कशासाठी हे करायचं? जंगलाच्या बाहेर जाऊन आम्ही करणार आहोत तरी काय?... उलट जंगलाच्या बाहेर जाणं म्हणजे जीव गमावणं. शिकारी केव्हा आणि कुठून येईल, काही सांगता येत नाही.

त्या जंगलात सर्व सुखसोयी होत्या. अनेकविध सोयींनी युक्त अशा जंगलातील प्राणी मात्र अडाणी होते. आणि त्याहीपेक्षा दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आपण अडाणी असल्यामुळं आपलं नुकसान होतं हे त्यांना कळत नसे. परवाचीच गोष्ट. बिरू अस्वलानं आपले जमिनीत पुरून ठेवलेले पैसे काढले. कलदार रुपये अर्थात नाणी तशी शाबूत होती. काळी सडली होती इतकंच. पण हजारो रुपयाच्या नोटा मात्र गायब झाल्या होत्या. मातीच झाली म्हणा ना. अक्षरश: हजारो रुपये नाहीसे झाले तरीही त्यानं पोलिसात तक्रार केली नाही. का बरं केली नसेल? येईल सांगता?... नाही ना?... थोडा विचार करा... तुमच्यापैकी काहींना वाटेल की त्यानं ते पैसे पुरून ठेवले होते म्हणजे तो चोरीचा पैसा असेल किंवा काळा पैसा असेल. तसा पैसा चोरीला गेला हे सांगणार तरी कसं?... पण तसंही नव्हतं. पैसा चोरीचा नव्हता. काळा पैसाही नव्हता. स्वत:च्या कष्टानं पूर्वी घेतलेली जमीन, मधे चांगला भाव आला म्हणून त्यानं विकून टाकली. त्याचे आलेले पैसे होते. चांगले साठ हजार रुपये आले होते. त्यापैकी तीन हजाराची नाणी होती. बाकीच्या नोटा. सर्व नोटा गायब झाल्या होत्या. साठ हजारापैकी तीन हजाराची नाणी आणि पूर्वीची सातशे रुपयाची नाणी तेवढी बाकी होती. एवढी रक्कम गायब झालेल्या बिरूला खरं तर मोठा धक्का बसायला हवा होता... त्याची शुद्ध सुद्धा हरपायला हरकत नव्हती. पण यातलं काहीही झालं नाही. उलट तो आणि त्याचे कुटुंबीय टेकडीवर गेले. वेताळापुढं गुडघे टेकून त्यांनी क्षमा मागितली.

मंदिरातल्या त्या भव्य मूर्तीला ते सांगत होते... देवा... वेताळा... माझं चुकलं... साठवायचे पैसे मी आणि माझे कुटुंबीय तुझ्या पायावर घातल्या शिवाय गाडग्यात ठेवत नव्हतो. पण काही दिवसांपूर्वी जमीन विकून आलेले पैसे आम्ही तुझ्या पायावर घातले नाहीत... देवा तशी चुकी आमचीही नाही रे... त्यादिवशी फार मोठा पाऊस होता. तुझ्या टेकडीवर येण्याचा मार्ग बंद झाला होता. यापूर्वी कशी फक्त नाणीच असायची ती पटकन आणता यायची. पण यावेळी नोटा होत्या. काही नोटा भिजल्या पण होत्या. आठ दिवस पाऊस थांबायला तयार नाही. आम्हाला काही सुचेना... आम्ही रात्री सारे पैसे आमच्या नेहमीच्या गाडग्यात पुरून टाकले... पंधरा दिवसांनी पाऊस कमी झाला पण तेव्हा आम्ही ही गोष्ट विसरून गेलो. आज दहा महिन्यांनी गरज लागली म्हणून बघायला गेलो तर नोटा गायब. देवा आमचं चुकलं आम्ही आता असं पुन्हा कधीही करणार नाही.

पाहिलंत?... असा वेडेपणा होता. त्या जंगलात अशी अंधश्रद्धा होती की जे काही साठवून ठेवायचं ते वेताळ टेकडीवरील वेताळाच्या मंदिरात नेऊन आधी वेताळाला दाखवायचं आणि मग जपून ठेवायचं म्हणजे काही होत नाही... अडाणीपणा असा की पैसे साठवून ठेवायला पाहिजेत... म्हणजेच बचत करायला हवी हे त्यांना माहीत होतं पण बचतीची पद्धत... फायद्याची पद्धत त्यांना ठावूक नव्हती. बिरूनं गाडग्यात ठेवलेले पैसे यामुळचं गायब झाले. त्याचं असं झालं. आपल्या घरात त्यानं जिथं पैशाचं गाडगं पुरून ठेवलं होतं तिथं 'वाळवी' होती. त्यादिवशी नोटा गाडग्यात भरताना ही वाळवी पण आत गेली. पावसानं नोटा काही भिजल्या होत्या... शिवाय गाडग्याचं तोंड त्यानं फक्त कापडानं बांधलं होतं. थोडक्यात काय तर वाळवीला संधी मिळाली आणि तिनं सर्व नोटा फस्त केल्या. पण बिरूला वाटत होतं की वेताळाला नोटा दाखवल्या नाहीत म्हणून त्याचा कोप झाला... म्हणजे आपण काय गमावलं?... आपण कसं गमावलं?... याची समजच त्यांना नव्हती. याचं कारण होतं फक्त अडाणीपणा... निरक्षरता...

वेताळाला पैसे दाखवले नाहीत म्हणून बिरूचे पैसे गायब झाले ही बातमी हां हां म्हणता सर्व जंगलात पसरली आणि त्याबरोबर अशाच काही बातम्या ऐकू येऊ लागल्या. गधोबा लांबकाने यांचं धान्य दोन वर्षापूर्वी असंच गायब झालं होतं. कुणाची शाल तर कुणाचे कागद. ज्या वस्तू वेताळाला दाखवल्या नव्हत्या त्या वर्षभरात गायब झाल्या होत्या. या सगळ्या बातम्या ऐकून ट्रिंकू कोल्हा, आणि भोलू कोल्हा दोघंही अस्वस्थ झाले. जंगलातील प्राण्यांना या अंधश्रद्धेपासून वाचवलं पाहिजे असं त्यांना मनापासून वाटलं. हे सारं घडलंय ते वेताळाच्या अवकृपेनं नाही तर तुमच्या अडाणीपणानं, हे प्राण्यांना पटवून देण्यासाठी त्यांनी प्राण्यांची सभा बोलावली. सभेला येताना भोलूनं बिरूला त्याचं गाडगं आणायला सांगितलं तर गधोबाला त्याचं धान्य ठेवलेलं रांजण.

सगळे प्राणी जमले. सिंह महाराज सुद्धा हजर होते. पावसाळ्याचे दिवस होते. वातावरण ढगाळ होतं. भोलूनं बिरूला त्याचं गाडगं आणायला सांगितलं. मंत्र म्हटल्याचे नाटक केलं. गधोबाचं रांजण

आणि बिरूचं गाडगं जवळच्याच नदीत स्वच्छ धुतलं. शेकोटी पेटवून ते चांगलं तापवलं. कोरडं केलं. बिरूच्या हातात काही नोटा आणि काही नाणी दिली... गधोबाजवळ थोडं धान्य दिलं. दोघांनाही ते वेताळाला दाखवून आणायला सांगितलं. ते गेल्यावर आपल्या जवळ असलेलं धान्य, नोटा, नाणी त्यांनी काढली. प्राण्यांना त्यानं सांगितलं हे पैसे हे धान्य वेताळाला दाखवलं नाही. आता माझ्या जवळ हे दुसरं मडकं आहे या मडक्यात किंवा गाडग्यात हे पैसे ठेवतो आणि या रांजणात हे धान्य. भोलू असं बोलत असता बिरू आणि गधोबा आले... वेताळाला पैसे आणि धान्य दाखवल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांच्याच गाडग्यात आणि रांजणात ते ठेवायला सांगितलं. आणखी काही मंत्र पुटपुटले. नोटांवर, धान्यावर पाणी शिंपडलं. हळद. कुंकू, अक्षदा टाकल्या. आणि मडक्यांची आणि रांजणांची तोंडं बांधून ती पुरून टाकली. महाराजांकरवी तिथं पहारा बसवला आणि सहा महिन्यांनी पुन्हा यायला सांगितलं.

भोलू आणि टिंकूनी दिलेली मुदत आज संपत होती. सगळे पुन्हा जमले. गाडगी आणि रांजणं काढली... बाहेर काढल्यावर बिरू आणि गधोबा यांना बोलावलं. तुमचं गाडगं आणि रांजण कोणतं म्हणून विचारलं. गाडग्यावर आणि रांजणावर त्यांचं नाव होतं. त्यामुळं त्यांनी ती दाखवली. प्राण्यांना उद्देशून भोलू म्हणाला यातलं धान्य आणि नोटा वेताळाला दाखवल्या होत्या. बघूया त्याची परिस्थिती. दोघांनी गाडगं आणि रांजणाचं तोंड उघडलं... आणि ते दोघं आश्चर्यचकित झाले... बिरूच्या गाडग्यातले पैसे आणि गधोबाच्या रांजणातलं धान्य गायब झालं होतं. फक्त नाणी राहिली होती. त्यानंतर जे धान्य आणि पैसे वेताळाला दाखवले नव्हते ते गाडगं आणि रांजण उघडलं तर त्यातले पैसे... म्हणजे नोटा आणि नाणी तसंच धान्य सुरक्षित होतं... प्राणी चक्रावून गेले. कुणालाच काही कळेना. मग भोलू बोलू लागला...

मित्र हो! यात न समजण्यासारखं काही नाही. वेताळाचाही यात काही संबंध नाही. बिरू पैसे पुरून ठेवत असे. पूर्वी फक्त नाणी असत त्यामुळे काही झालं नाही. पण नोटा आल्यावर एक वेगळी गोष्ट झाली. बिरूनं जेव्हा नोटा पुरल्या त्यावेळेस काही नोटा भिजल्या, शिवाय आपल्या घरात तो ते गाडगं जिथं पुरत असे तिथं वाळवी होती. ती वाळवी पण गाडग्यात गेली आणि हजारो रुपये तिनं खाऊन फस्त केले. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे पैसा असा गाडग्यात पुरायलाच नको. आपल्या जंगलात निघालेल्या नवीन बँकेत किंवा पोस्टात त्यानं हे पैसे ठेवले असते तर पैसे तर गायब झाले नसतेच. उलट व्याजाने पाच-सहा हजार रुपये त्याला जादा मिळाले असते. गधोबाचं सुद्धा साधारण तसंच. धान्य साठवायचं म्हणजे नुसतं रांजणात भरलं की झालं असं त्याला वाटतं. पण तसं नाहीये. धान्य कडक उन्हात चांगलं वाळवलं पाहिजे. लिंबाचा पाला वगैरे घालून तोंड बंद करून ते ठेवलं पाहिजे. गधोबाच्या धान्यात भुगा होऊन त्यांनी सगळं धान्य फस्त केलं.

त्यानंतर ट्रिंकू उभा राहिला. म्हणाला की, मित्रहो! तुम्हाला आश्चर्य वाटलं असेल की भोलूच्या गाडग्यातील, रांजणातील पैसे धान्य कसं सुरक्षित राहिलं. त्यानं त्याची काळजी घेतली. दोन्ही म्हणजे



गाडगं आणि रांजण धुवून कोरडे करून आणले होते. धान्य वाळवून आणलं होतं. सर्व काळजी घेतल्यानं त्याचं धान्य, पैसे शाबूत राहिले. उलट मंत्राचं नाटक करत हळद, कुंकू, अक्षता टाकताना वाळवी आणि किडे त्यात टाकले. थोडं पाणीही टाकलं त्यामुळं कीड, वाळवीसाठी पोषक वातावरण तयार झालं . . . हे सारं घडलं ते तुम्ही अडाणी . . . निरक्षर असल्यामुळं.

हे सारं ऐकताच सिंह महाराज खूष झाले. त्यांनी ताबडतोब जंगलात जाणीव जागृतीचा कार्यक्रम घ्यायचं ठरवलं. प्रौढ शिक्षणाचे केंद्रही सुरू करण्याचे आदेश दिले. यापुढं आपली फजिती होऊ नये म्हणून, या केंद्रात शिकायला जायचं असं प्रत्येक जण घरी जाताना ठरवत होता.

● ● ●

# ‘आळशी भोलू’

झुळझुळ वन तसं शांतवन म्हणून ओळखलं जात होतं. भांडणं... मारामाऱ्या... किंवा तंटेबखेडे या वनांत अजिबात नव्हते. प्रत्येकजण आपापलं काम करत असे. दुसऱ्याच्या कामात ते कधीही लक्ष घालत नसत. त्यामुळे सिंह महाराजांच्या दरबारात न्याय-निवाड्यासाठी फारसं कुणी फिरकत नसे. भांडणच नाही तर फिर्याद कशाची? पण यामुळे आणखी एक विचित्र गोष्ट महाराजांच्या नजरेला आली होती, ज्यामुळे सिंह महाराज अगदी अस्वस्थ झाले होते. त्याचं असं झालं...

या आपल्या झुळझुळ वनाच्या शेजारी गुरगुर वन होतं. या वनांत प्रण्यांची नेहमीच गुरगुर चालत असे. या वनातले काही प्राणी अतिशय हिंस्त्र होते. पण सिंह महाराज तितकेच कडक असल्याकारणाने या क्रूर प्राण्यांचंही काही चालत नसे. अशातच एका अस्वलाला महाराजांनी हद्दपार केलं. अस्वलापुढे प्रश्न होता जायचं कुठं? एका बाजूला झुळझुळ वन हातं. एका बाजूला सळसळ वन होतं. या क्रूर अस्वलानं विचार केला, आपण झुळझुळ वनातच जाऊ. तिथं आपला उदरनिर्वाह चांगला चालेल. चार प्राण्यांना दम दिला की आपलं भागेल. चार पैसे मिळतील आणि चैनीत रहाता येईल.

त्याप्रमाणे तो गुपचूप एका रात्री झुळझुळ वनात घुसला... दोन दिवसात त्यानं आपला जम चांगलाच बसवला. पहिल्यांदा त्यानं गरीब पशु-पक्षांना लुटलं. मग जरा सशक्त प्राण्यांकडे तो वळला. पण त्यांच्याकडूनही फारसा प्रतिकार त्याला झाला नाही. कारण या वनातले प्राणी भांडण विसरलेच होते. त्यामुळे प्रतिकार करणंही विसरून गेले. या अस्वलाचं चांगलंच फावलं. त्यानं मोठी लुटालूट चालू केली. एकदा तर त्यानं सळसळ वनातील पोस्टमन ‘दिमाख घोडा’ यालाच लुटलं. नकली पिस्तुलाचा धाक दाखवून त्याच्याजवळ असणारे मनी ऑर्डरचे सहा हजार रुपये घेऊन तो पसार झाला. पण पैसे सरकारी असल्याने ‘दिमाख’नं गेंडेबुवांच्या पोलीस चौकीत जाऊन तक्रार केली. आणि अशाप्रकारे ते प्रकरण सिंह महाराजांकडे गेलं.

दिमाख घोड्यांबराबर चर्चा केल्यानंतर काय प्रकार आहे याची त्यांना कल्पना आली. आपल्या राज्यावर आलेलं हे संकट पहिल्यांदा परतवलं पाहिजे हे त्यांना ठाऊक होतं. या अस्वलाचा लूटमारीचा मार्ग कोणता? तो पहिल्यांदा त्यांनी पाहिला. मग एक दिवस सोनं, हिरे-मोत्यांचे दागिने घालून एका झाडाखाली ते आजाऱ्यासारखे झोपून राहिले. त्यांच्या अंदाजाप्रमाणे अस्वल तिकडून सावज हेरत येतच

होतं. सिंहाला बघितल्यावर पहिल्यांदा अस्वल थोडं घाबरलं. पण सिंह आजारी असल्यानं तो झाडाखाली पडलाय असच त्याला वाटलं. शिवाय इथले प्राणी सशक्त असले तरीही प्रतिकार करत नाहीत हे त्यानं अनुभवलं होतं. आणि मुख्य म्हणजे या सिंहाच्या अंगावर दागिने, हिरेमाणकाचे आहेत. खूप पैसा मिळेल असं मनात योजून आपलं नकली पिस्तुल त्याला दाखवत तो ओरडला, 'मुकाट्यानं दागिने हवाली कर. नाहीतर ठार करीन'. महाराजानी नाटक केलं. मला उठवत नाही. अंगात ताप आहे. तूच काढून घे असं त्याला सांगितलं. लालची अस्वलाला दागिन्यांपुढं हा कावा लक्षात आला नाही. तो जवळ येताच सिंहानं मोठी गर्जना केली. अस्वलाच्या हातातलं पिस्तुल दूर उडालं. अस्वल घाबरून गेलं. महाराजानी एका फटक्यातच त्याला यमसदनास पाठवलं. झुळझुळ वनावर आलेलं परकीय संकट तूर्त तरी टळलं होतं.


प्रधानजी वाघोबाला बोलावून त्यानी विचारविनिमय केला. दुसऱ्या जंगलातलं एक साधं अस्वल येतं काय आणि आपले धडधाकट प्राणी त्याचा प्रतिकार करू शकत नाहीत? हे योग्य नाही. शेजारच्या जंगलातल्या बदमाश प्राण्यांना जर हे कळलं तर ते सरळ आपल्या जंगलात घुसतील आणि आपल्या गरीब प्राण्यांना लुबाडतील. हे असं व्हायला नको. हे का घडलं याचा शोध घ्यायला हवा.

वाघोबांनी बारकाईनं शोध घेतला. त्याला असं दिसलं की याला जबाबदार आपणच. म्हणजे असं की जंगलात कुठल्याही प्रकारचे कार्यक्रम नाहीत त्यामुळे सगळे प्राणी आळशी झाले आहेत. आपल्या शक्तीचा त्यांना स्वत:लाच अंदाज नाही. आपली शक्ती कशी उपयोगात आणावी ते त्यांना कळत नाही. साहजिकच साध्या अस्वलानंही बाजी मारली. सिंह महाराजांना हे पटलं. जंगलात थोडीही कुरबुर नाही म्हणून आपल्याला आनंद वाटत होता पण शांततेचा हा परिणाम भयंकरच आहे. थोडी कुरबुर परवडली पण असला पोकळ देखावा काय कामाचा? महाराजांनी लगेच मंत्रीमंडळाची विशेष बैठक बोलावली. बैठकीत उपाययोजनांवर चर्चा झाली.

सध्या झुळझुळ वनात सर्वांच्या तोंडी एकच विषय होता. काहीतरी पराक्रम करून दाखवायचा. काहीतरी वेगळं करायचं. असं वेगळं करणाऱ्याला महाराज त्यांच्या लायकीप्रमाणे बक्षीस देणार होते. दर गुरुवारी जंगलाच्या मध्यवर्ती मैदानात पशु-पक्षांनी आपलं प्रात्यक्षिक दाखवायचं. महाराज ते पहातील. सर्वांची प्रात्यक्षिकं संपल्यावर मग योग्यतेनुसार बक्षिसं देतील.

सुरुवातीला दोन महिने कुणी प्रात्यक्षिकं दाखवली नाहीत. महाराज चिंतेत पडले. पण वाघोबांनी जेव्हा कानोसा घेतला तेव्हा कळलं की प्राणी तयारी करताहेत. महाराज सुखावले. आणि लवकरच एका गुरुवारी दोन नावं वाघोबांकडं आली. एक नाव होते चपळू हरिणाचं आणि दुसरं होतं भैरू अस्वलाचं.

मैदानात प्रचंड गर्दी होती. भैरू आणि चपळू काय करणार याकडे सगळ्याचं लक्ष लागलं होतं. महाराज आसनावर येऊन बसले आणि क्षणाधत मैदानाच्या चारी बाजूला असलेल्या झाडावरून मैदानात बाणांचा वर्षाव सुरू झाला. अक्षरश: बाणांचा पाऊस... आणि मैदानातल्या एका कोपऱ्यातून चपळू


POST
BAG NO 9

एवढ्या वेगानं दौडत आला की बघता बघता ता मैदानाच्या दुसऱ्या टोकाकडे निघून पण गेला. एकही बाण त्याला लागला नाही. असं एकदा नाही दोनदा नाही तर विविध कोपऱ्यातून सुरुवात करून त्यानं सात वेळा मैदान पार केलं आणि यापैकी एकदाही एकही बाण त्याला लागला नाही. चपळाईतलं चपळूचं हे कौशल्य बघून स्वत: महाराजांनी टाळ्या वाजवल्या. इतर प्राण्यांनी तर टाळ्या वाजवून मैदान अक्षरश: डोक्यावर घेतलं.

टाळ्यांचा हा कडकडाट चालू असतानाच एका कोपऱ्यातून तलवारींचे आवाज ऐकू आले. सगळे तिकडे पाहू लागले. तर आठ-दहा गुंड भैरूवर तलवारी घेऊन तुटून पडले होते. ते त्याच्यावर चहुबाजूंनी हल्ला करत होते आणि भैरू त्याचा सामना करत होता. त्यांच्याशी लढत लढत तो मैदानाच्या मध्यभागी आला. सुमारे अर्धा तास ही लढाई चालली. या अर्ध्या तासात भैरूला केवळ दोनदाच खरचटलं तर बाकीच्या गुंडाना अनेक जखमा झाल्या. शेवटी गुंड दमले आणि पळून गेले. भैरूचा पराक्रम खरोखरीच अचाट होता. गुंड पळून जाताच भैरूनं महाराजांना वंदन केलं आणि तो प्रेक्षकात जाऊन बसला.

महाराजांनी आपल्या गळ्यातला मौल्यवान हिऱ्यांचा कंठा चपळूला दिला तर एक रत्नजडित तलवार भैरूला भेट दिली. शिवाय दोघांनाही सैन्यात विशेष पदावर दाखल करून घेतलं. भैरू आणि चपळूचं कौतुक करत प्राणी घराकडे परतले.

भैरू, चपळूच्या कौशल्यानंतर प्राण्यांत जणू चढाओढच लागली. विविध प्राणी आपलं कौशल्य दाखवू लागले. झुळझुळ वनात नावीन्याच्या लहरी झुळझुळायला लागल्या. त्याच वनात भोलू कोल्हा रहात होता. नाव जरी भोलू होतं तरी तो काही भोळा नव्हता. अत्यंत स्वार्थी होता. प्राण्यांना फसवून तो आपला उदरनिर्वाह चालवत असे. पण अलिकडे प्राणी पण हुशार झाले होते. ते भोलूच्या गोड बोलण्याला फसत नसत. सहाजिकच भोलू वैतागला. त्याला काम करायला नको असायचं... मग आता करायचं काय ? ... तो आपला झोपून रहायचा. त्याच्या या झोपाळू वृत्तीमुळं कोल्हीण वैतागली. भोलू रहायचा झोपून.. त्यामुळं घरातलं सगळं तिलाच बघावं लागायचं... बरं! भोलूला अधिक काही बोलावं तर भोलू जंगलात कुठंतरी जाऊन झाडाखाली झोपायचा. मग दिवस दिवस घरी परतायचाच नाही. कोल्हीणीला काळजी वाटायची. गुहेत ती एकटीच ... कधी कधी भीती वाटायची.

चपळू, भैरू तसेच अनेक प्राण्यांच्या पराक्रमाच्या नावीन्याच्या कथा वनात पसरू लागल्या. आणि एक दिवस नको ते घडलं. भोलू कोल्हयाचं त्याच्या बायकोशी कडाक्याचं भांडण झालं. तिनंही खूप तोंडसुख घेतलं. आणि मग रानात भोलू घराबाहेर पडला. काहीतरी करून दाखवा आणि मग मला बोला ... हे बायकोचं वाक्य त्याला खूप लागलं होतं. काही तरी करून दाखवलंच पाहिजे. असं ठरवून तो निघाला खरा पण काय करायचं ? ... विचार करता करता तो थकून गेला. आणि एका विजेच्या खांबाला टेकून बसला. तिथंच त्याला झोप लागली. दुपारी झोपलेला भोलू मध्यरात्री केव्हातरी उठला ... अर्थात जागा झाला ... सुमारे पंधरा तास तो झोपला होता. त्याला एक कल्पना सुचली. आपण अधिकाधिक

तास झोपण्याचा पराक्रम केला तर ? . . . महाराज नक्कीच बक्षिस देतील. आणि मग बायकोलाही काहीतरी करून दाखवल्यासारखं होईल. असं म्हणून तो उड्या मारत निघाला. तो दिवस मंगळवार होता. भोलू वाघोबांना भेटला. वाघोबांनी परवानगी दिली आणि भोलूला आनंद झाला. तो कामाला लागला.

मैदानात चांगली मध्यवर्ती जागा बघून त्यानं छान गवताची गादी तयार केली . . . भरपूर जेवण करून तो आलाच होता. मंगळवारी दुपारी दोन वाजता तो झोपण्यासाठी सिद्ध झाला. वाघोबांनी एका शिपायाला त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी ठेवलं होतं. त्याला सांगून भोलू गवताच्या गादीवर पहुडला आणि बघता बघता घोरू लागला. दर चार तासांनी पहाऱ्यावरचा शिपाई बदलायचा. पण भोलूचा घोरण्याचा सूर आपला चालूच.

गुरुवारचा दिवस उजाडला. दुपारी मध्यवर्ती मैदानात सगळे जमले. सिंह महाराज आले. कार्यक्रम सुरू करण्यास त्यांनी फर्मावलं. वाघोबा उभे राहिले. त्यांनी सांगितलं आज भोलू कोल्हा आणि लंबू उंट आपली कला दाखवणार आहेत. सुरुवातीला लंबू आपली कला दाखवील.

लंबू आणि त्याचा मित्र कालू माकड मैदानात आले. कालू एका बाजूला लांब उभा राहिला. लंबू एक कागद घेऊन महाराजांकडं गेला. यावर काहीही संदेश लिहा. असं त्यानं सांगितलं. वनराजानं संदेश लिहिला. तो कागद घेऊन लंबू दुसऱ्याबाजूला कालूपासून लांब उभा राहिला. लंबू मग चित्रविचित्र हातवारे करू लागला. मधेच मान खाली घेई. तर कधी वर करी. मधेच धावे. मधेच खाली बसे. त्याची अशी कसरत चालू होती आणि इकडे कालू काहीतरी लिहीत होता. लंबूची ती कसरत संपताच कालूनं तो कागद महाराजांपाशी दिला. महाराज खूष झाले. त्यांनी लंबूला दिलेला संदेश तंतोतंत उतरला होता. लंबू आणि कालूचं कौतुक झालं. नंतर वाघोबा मैदानाच्या मध्यभागी असलेल्या गवताच्या ढिगाकडं गेले. तो ढीग तिथं का ? याचं कोडं इतर प्राण्यांनाही होतचं. ढिगाऱ्यापाशी जाताच वाघोबानी भोलूला उठवायचा प्रयत्न केला. पण भोलू काही उठेना. त्याचं घोरणं चालूच होतं. मग वाघोबानी एक मोठी गर्जना केली त्याबरोबर भोलू ताडकन उठून उभा राहिला. पहिल्यांदा त्याला काही कळेचना. मग वाघोबानी त्याचा हात धरून सांगितलं, मित्रहो यानं सतत पन्नास तास झोपण्याचा विक्रम करून एक वेगळा कार्यक्रम सादर केला आहे. प्राण्यांनी टाळ्या वाजवून त्याचं कौतूक केलं.

बक्षिस देण्यासाठी महाराज उभे राहिले. त्यानी लंबू आणि कालूला एकेक रत्नजडित हार बक्षिस दिला आणि भोलूला मात्र कवड्याची माळ. सगळ्यानाच आश्चर्य वाटलं. मग महाराज म्हणाले मी आज काहीही बोलणार नाही. मी लंबूला दिलेला संदेश वाघोबा वाचून दाखवतील. मग वाघोबानी संदेश वाचून दाखवला. 'जंगलवासियांनो ! अशी कला अवगत करा की ज्याचा उपयोग तुमच्या मातृभूमीसाठी होईल. मित्रांसाठी होईल. अशा कलेची किंमत मौल्यवान रत्नाहूनही अधिक आहे. बाकीच्या कला या कवडीमोल आहेत'.

भोलूला कवड्याची माळ का ? याचं उत्तर सर्वांना मिळालं. भोलू खाली मान घालून घराकडं

निघाला. डोक्यात एकच विचार, आता अशी काहीतरी कला संपादन करीन की महाराज मलाही रत्नजडीत हार देतील.

**गोविंद महेश्वर गोडबोले**
कार्यक्रम अधिकारी
आकाशवाणी
रत्नागिरी
पिन ४१५६१२